# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-७९ दिनांक - ०७/०३/२०२४

## प्रेसनोट

## आगामी लोकसभा निवडणुक २०२४ च्या पार्श्वभुमीवर मिरा-भाईदरमध्ये पोलीसांचे व केंद्रीय सुरक्षा बलाचे रुटमार्च

आगामी लोकसभा निवडणुक २०२४ साठी मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत मिराभाईंदर परिसरासाठी केंद्रीय गृहमंत्रालय अंतर्गत कार्यरत असणारी केंद्रीय औद्योगीक सुरक्षा बलाची १ कंपनी दाखल झाली आहे. सदर कंपनीला मिरा भाईंदर परिसरातील मतदानक्षेत्राचे संपुर्ण परिस्थीतीची ओळख व्हावी, परिसरातील मतदान केंद्र, बुथ, मिश्र लोकवस्तीचे ठिकाणे, गर्दीचे ठिकाणे यांची माहिती व्हावी व संवेदनशिल परिसराची माहिती व्हावी म्हणुन दि. ०५.०३.२०२४ रोजी नवघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये ११.०० ते १२.४५ वाजेचे दरम्यान, भाईंदर पोलीस ठाणे हद्दीमध्ये १६.०० ते १७.४० वाजेचे दरम्यान व नयानगर पो.ठाणे हद्दीमध्ये १८.०० ते २०.०० वाजेचे दरम्यान रुटमार्चचे आयोजन करण्यात आले होते.

नवघर पोलीस ठाणे हद्दीत स्व.मिनाताई ठाकरे हॉल, इंद्रलोक - रामदेवपार्क रोड - क्विन्सपार्क - दिपक हॉस्पीटल रोड - गोल्डन नेस्ट सर्कल- न्यु गोल्डन नेस्ट हनुमान मंदीर- जैन हॉस्पीटल पी.के. रोड- गुरुजी चौक इंद्रलोक फेस-४- स्व.मिनाताई ठाकरे हॉल, भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत झायका हॉटेल-मॅक्सेस मॉल- मांडवी तलाव-भाईंदर पो.स्टेशन- स्टेशन रोड-शिवसेना गल्ली-बॉम्बे मार्केट-६० फुट रोड-९० फुट रोड. तसेच नयानगर पोलीस ठाणे हद्दीत गोल्डन नेस्ट- टिपु सुलतान-लोढाराड- नरेंद्र पार्क-शम्स चौकी-मिरारोड स्टेशन-शांतीनगर मार्केट-जैन मंदीर-रसाज सर्कल असे रुटमार्चचे आयोजन करण्यात आले होते.

रुटमार्चनंतर श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांनी केंद्रीय औद्योगीक सुरक्षा बलाचे अधिकारी व जवान यांना मिराभाईंदर परिसराची व मिराभाईंदर मधील सध्याचे एकुणच परिस्थीतीची कल्पना देवुन आगामी लोकसभा

निवडणुक २०२४ चे बंदोबस्तसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच केंद्रीय औद्योगीक सुरक्षा बलाचे अधिकारी व जवान यांना राहण्यासाठी केलेल्या व्यवस्थेची पाहणी केली.

नमुद रुट मार्च करीता श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ मि.भा.व.वि. तसेच श्री राजेद्र मोकाशे, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग, श्रीमती दिपाली खन्ना, सहाय्यक पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग, श्री. धिरज कोळी, प्रभारी अधिकारी, नवघर पो.ठाणे, श्री. सुर्यकांत नाईकवाडी, भाईंदर पो.ठाणे, श्री. विलास सुपे, नयानगर पो.ठाणे, श्री देशमुख, पोलीस निरीक्षक, सी.आय.एस.एफ., नवघर पोलीस ठाणे, भाईंदर पो.ठाणे व नयानगर पो.ठाणेतील इतर पोलीस अधिकारी व १२० अंमलदार तसेच सी.आय.एस.एफ. कंपनीचे ७० जवान हजर होते.

-----ooo-----